Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education,
Kolhapur Divisional Board,
539, Rajendranagar,
Kolhapur - 416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
५३९, राजेंद्रनगर,
कोल्हापूर - ४१६००४

Ph. No. (0231) 2696101/ 2 / 3 Website - www.sscboardkolhapur.in Email - divsec.kop@gmail.com

**अत्यंत तातडीचे**

क्र.कोविमं/लेखा/दुष्काळ-2023/परीक्षा फी फेब्रु/मार्च 2024/ 3734
दिनांक : 15 / 03 / 2024

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य
सर्व माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली / कोल्हापूर

**विषय** : **सन २०२३-२४ मधील राज्यातील दुष्काळसदृश्य भागातील विद्यार्थ्यांची (इ.१० वी व इ.१२ वी) परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेची अंमलबजावणीबाबत (कार्यपध्दती)**.

**संदर्भ** : 1) **महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.एससीवाय**-2023/**प्र.क्र.**37/**म**-7 **दि.**31.10.2023
2) **या कार्यालयाचे क्र.कोविमं/लेखा/दुष्काळ**-2023/**परीक्षाफी**/2307,**दि.**28.11.2023 **चे पत्र**
3) **राज्य मंडळाचे क्र. रा.मं./ टं.वि.परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती** 23-24 / 1131, **दि.** 13.03.2024.

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, शासनाने उपरोक्त संदर्भिय क्र. 1 व 2 च्या शासन निर्णयानुसार टंचाईग्रस्त / दुष्काळग्रस्त भागातील इ.10 वी व इ.12 वी च्या विद्यार्थ्यांचे संपूर्ण परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती ही राज्यमंडळ स्तरावरून करण्यात येणार आहे.

शासन निर्णयानुसार जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य 40 तालुके व याव्यतिरिक्त 1021 महसूल विभागातील बाधित श्रेत्रातील सर्व माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना **माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी - मार्च** 2024 मधील परीक्षेस प्रविष्ट झालेल्या नियमित विद्यार्थ्यांची यादी अनुक्रमे http://feerefund.mh-ssc.ac.in आणि http://feerefund.mh-hsc.ac.in ह्या लिंकवर उपलब्ध करून दिलेली आहे. सदर लिंक मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर (mahahsscboard.in) प्रसिध्द करण्यात आली आहे. संगणक प्रणालीच्या अनुषंगाने आवश्यक सूचना (कार्यपध्दती) या पत्रासोबत देण्यात येत आहे.

सदर योजना नव्याने कार्यान्वित झाली असून या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी **दिनांक 20 मार्च 2024 पर्यंत ऑनलाईन पध्दतीने माहिती भरण्यात यावी**. सदर लाभापासून विद्यार्थी वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

सोबत : दुष्काळसदृश्य भागातील विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क प्रतिपर्ती योजनेची कार्यपध्दती.

**(सुभाष रा.चौगुले)**
**विभागीय सचिव**,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत :

1. मा. सचिव, राज्य मंडळ, पुणे.
2. मा. शिक्षण उपसंचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, हत्ती महल, सोमवारपेठ, कोल्हापूर
   यांना कळविण्यात येते की, सदर पत्रानुसार सर्व कार्यवाही तातडीने पूर्ण होईल असे पहावे.
3. शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, सातारा / सांगली / कोल्हापूर
   यांना कळविण्यात येते की, **तातडीने सर्व मुख्याध्यापक / प्राचार्य यांचेशी समक्ष संपर्क साधून बाधित श्रेत्रातील पात्र विद्यार्थ्यांची माहिती ऑनलाईन पध्दतीने राज्यमंडळास विहित वेळेमध्ये** (दिनांक 20 मार्च 2024 **पर्यत) सादर होण्याच्या दृष्टीने पाठपुरावा करावा**.

D/Ansar/Dushkal 23-24/Letter

## सन 2023-24 मध्ये राज्यातील जाहीर झालेले दुष्काळसदृश्य 40 तालुके व त्याव्यतिरिक्त 1021 महसूल विभागातील इ.10 वी व इ.12 वीच्या विद्यार्थ्यांना RTGS / NEFT द्वारे परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना

### * कार्यपध्दती *

1 शासन निर्णय क्र. संकीर्ण 2019/प्र.क्र.47/एसडी-5, दिनांक 01.08.2019 व शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण 2019/प्र.क्र.र.47/एसडी-5, दिनांक 03.02.2020 नुसार सन 2023-24 मध्ये 15 जिल्हयातील 40 तालुके आणि या तालुक्याव्यतिरिक्त 1021 महसूल विभागातील इ.10 वी व इ. 12 वीच्या या योजनेस पात्र असलेल्या नियमित विद्यार्थ्यांना आकारण्यात आलेल्या संपूर्ण परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती राज्य मंडळस्तरावरून, पात्र नियमित विद्यार्थ्यांच्या / पालकांच्या आधार संलग्न Bank Account मध्ये NEFT / RTGS द्वारे करण्यात येणार आहे.

2 दुष्काळ बाधित श्रेत्रातील सर्व माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी / मार्च 2024 मधील परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या नियमित विद्यार्थ्यांची यादी इ. 10 वी साठी http://feerefund.mh-ssc.ac.in आणि इ. 12 वी साठी http://feerefund.mh-hsc.ac.in हया दोन लिंकवर उपलब्ध करून दिलेली आहे. सदर लिंक मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर http://mahahsscboard.in प्रसिध्द करण्यात आली आहे.

3 सदर लिंकवर पहिल्या रकान्यात विद्यार्थ्यांनी परीक्षा आवेदनपत्रामध्ये सादर केलेल्या माहितीच्या आधारे माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव व सांकेतिक क्रमांक (Index Number), विद्यार्थ्यांचे नांव, विद्यार्थ्यांचे गांव, महसूल मंडळ, तालुका, जिल्हा, बैठक क्रमांक, आधार क्रमांक, आवेदनपत्रामध्ये नमूद केलेला Bank Account Number, Bank IFSC Code अशी माहिती उपलब्ध करून दिलेली आहे. सदर माहितीमध्ये जर काही सुधारणा / दुरूस्ती करावयाची असल्यास EDIT हा पर्याय उपलब्ध केलेला आहे.

4 **मुख्याध्यापक / प्राचार्य, माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय यांनी दुसऱ्या रकान्यामध्ये नमूद केलेले पाच पात्रता निकष तपासून त्यापुढे बरोबर (✓) असे दर्शविल्यानंतरच तो विद्यार्थी ह्या योजनेतंर्गत परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीसाठी पात्र होणार आहे. अन्यथा सदर विद्यार्थी ह्या योजनेतंर्गत परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीसाठी अपात्र ठरणार आहे.**

5 पात्र विद्यार्थी निश्चित करताना शासन निर्णय दि. 01.08.2019 व शासन शुध्दीपत्रक दि. 03.02.2020 मध्ये नमूद पात्रता निकष आणि सन 2023 मध्ये जाहीर करण्यात आलेल्या तालुक्यांची / महसूल विभागांची यादी विचारात घ्यावी. सदर शासन निर्णय उपरोक्त लिंकवर उपलब्ध करून दिलेला आहे.

6 पात्र झालेल्या विद्यार्थ्यांच्या नावाखाली "**Qualify**" दर्शविले जाईल. त्यानंतर सदर विद्यार्थ्यांची **Bank Account** ची माहिती भरण्यास रकाने उपलब्ध (**enable**) केले जातील. या पध्दतीने सर्व पात्र विद्यार्थ्यांचे निश्चितीकरण करण्यात यावे. हया योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांची सर्व माहिती क्रमाने (Bank Account Number, IFSC Cobe, MICR Code, खातेदाराचे नाव, खातेदाराचा आधार क्रमांक, खातेदाराचे लाभार्थ्यांशी नाते इ.) नव्याने भरणे आवश्यक आहे. रकान्यातील सर्व माहिती परिपूर्ण / अचूकपणे भरण्यात यावी.

7 "**Qualified / Disqualified**" लाभार्थ्यांची यादी प्रमाणित (यादीच्या शेवटी सहा मुद्दे नमूद केले आहेत) केल्यानंतर मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी स्वाक्षरी **Upload** करावयाची आहे. स्वाक्षरी **Upload** केल्यानंतर **Submit** हे बटन उपलब्ध होईल. त्यानुसार **Bank Account** चा तपशील प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती निर्धारित दिनांक 20 मार्च 2024 अखेर **Online** पध्दतीने राज्यमंडळास सादर (**Submit**) करावयाची आहे. **माहिती एकदा Submit केल्यानंतर पुन:श्च Submit करता येणार नाही. सदर माहिती Online पध्दतीने राज्य मंडळास प्राप्त होणार आहे.**

कृ.मा.प.

8 परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेतंर्गत सर्व अभिलेख (**प्रमाणपत्र** Annexure A, B) हे संबंधित माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर जतन करण्यात यावेत.

9 प्रिंट घेतलेले प्रमाणपत्र, प्रपत्र अ व प्रपत्र ब यांची एक सांक्षाकित प्रत विभागीय मंडळास सादर करावी.

10 परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती ही राज्यमंडळ स्तरावरून NEFT / RTGS द्वारे विद्यार्थ्यांच्या / पालकांच्या आधार संलग्न Bank Account मध्ये वर्ग करण्यात येणार असल्याने, **सदर माहिती उपलब्ध न झाल्यास अथवा चुकीची माहिती अथवा चुकीचा Bank Account दिल्यास सदर लाभापासून विद्यार्थी वंचित राहणार असल्याने परिपूर्ण माहिती निर्धारित कालावधीमध्ये भरण्याची दक्षता घेण्यात यावी. ही जबाबदारी पूर्णत: संबंधित मुख्याध्यापक / प्राचार्य यांची राहील.**

11 **शासन निर्णय दिनांक** 01.08.2019 **मधील अ.क्र. 8 नुसार ही योजना स्वयं अर्थसहाय्यित शाळा वगळता अन्य सर्व म्हणजे शासकीय / खाजगी अनुदानित / विना अनुदानित माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लागू राहील.**

12 उपरोक्त सर्व माहिती परिपूर्ण / अचूक भरल्याशिवाय पात्र लाभार्थ्यांना परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीची रक्कम वर्ग केली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**(सुभाष रा.चौगुले)**
**विभागीय सचिव,**
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

D/Ansar/Dushkal 23-24/Letter

# प्रपत्र "अ"

इयत्ता १०वी मार्च २०२४ च्या परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांची यादी
(शासन निर्णय क्र.एसमीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि.३१/१०/२०२३ अनुसार १५ जिल्ह्यातील ४० तालुके व दि.१०/११/२०२३ अनुसार ४० तालुक्यांव्यतिरिक्त १०२१ महसूल विभाग)

अ) शाळा / कनिष्ठ महाविद्यालय
- १. नाव :
- २. इंडेक्स क्रमांक :
- ३. पत्ता :
- ४. तालुका : जिल्हा : पिनकोड :

ब) मुख्याध्यापक / प्राचार्य
- १. नाव :
- २. भ्रमणध्वनी क्रमांक
- ३. ईमेल :

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव (माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च 2024) | विद्यार्थ्याचा बैठक क्रमांक | दुष्काळ / टंचाईग्रस्त यादीतील घोषित असणारे विद्यार्थ्यांचे मूळ गाव आणि महसूल | विद्यार्थ्यांचे बँक खाते क्रमांक | विद्यार्थ्यांच्या बँकेचा IFSC code |
|---|---|---|---|---|---|
| 1. | | | | | |
| 2. | | | | | |
| 3. | | | | | |
| 4. | | | | | |
| 5. | | | | | |
| 6. | | | | | |
| 7. | | | | | |
| 8. | | | | | |
| 9. | | | | | |
| 10 | | | | | |
| 11 | | | | | |
| 12 | | | | | |
| 13 | | | | | |
| 14 | | | | | |
| 15 | | | | | |
| 16 | | | | | |
| 17 | | | | | |
| 18 | | | | | |
| 19 | | | | | |
| 20 | | | | | |
| 21 | | | | | |
| 22 | | | | | |
| 23 | | | | | |
| 24 | | | | | |
| 25 | | | | | |

टिप : – यादीच्या प्रत्येक पृष्ठावर स्वाक्षरी असावी.
** सदर प्रपत्राची एक प्रत संबधित विभागीय मंडळास सादर करावी.

स्वाक्षरी व शिक्का
मुख्याध्यापक / प्राचार्य

# प्रपत्र "ब"

इयत्ता १२वी फेब्रुवारी / मार्च २०२४ च्या परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांची यादी
(शासन निर्णय क्र.एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि.३१/१०/२०२३ अनुसार १५ जिल्ह्यातील
४० तालुके व दि.१०/११/२०२३ अनुसार ४० तालुक्यांव्यतिरिक्त १०२१ महसूल विभाग )

अ) शाळा / कनिष्ठ महाविद्यालय
१. नाव :
२. इंडेक्स क्रमांक :
३. पत्ता :
४. तालुका : जिल्हा : पिनकोड :

ब) मुख्याध्यापक / प्राचार्य
१. नाव :
२. भ्रमणध्वनी क्रमांक
३. ईमेल :

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव (उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी / मार्च 2024) | विद्यार्थ्यांचा बैठक क्रमांक | दुष्काळ / टंचाईग्रस्त यादीतील घोषित असणारे विद्यार्थ्यांचे मूळ गाव आणि महसूल | विद्यार्थ्यांचे बँक खाते क्रमांक | विद्यार्थ्यांच्या बँकचा IFSC code |
|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | |
| 2 | | | | | |
| 3 | | | | | |
| 4 | | | | | |
| 5 | | | | | |
| 6 | | | | | |
| 7 | | | | | |
| 8 | | | | | |
| 9 | | | | | |
| 10 | | | | | |
| 11 | | | | | |
| 12 | | | | | |
| 13 | | | | | |
| 14 | | | | | |
| 15 | | | | | |
| 16 | | | | | |
| 17 | | | | | |
| 18 | | | | | |
| 19 | | | | | |
| 20 | | | | | |
| 21 | | | | | |
| 22 | | | | | |
| 23 | | | | | |
| 24 | | | | | |
| 25 | | | | | |

टिप : - यादीच्या प्रत्येक पृष्ठावर स्वाक्षरी असावी.
** सदर प्रपत्राची एक प्रत संबंधित विभागीय मंडळास सादर करावी.

स्वाक्षरी व शिक्का
मुख्याध्यापक / प्राचार्य

# प्रमाणपत्र(माध्यमिक / उच्च माध्यमिक)

प्रमाणित करण्यात येते की,

१. उपरोक्त यादीमध्ये शासन निर्णय (शालेय शिक्षण विभाग) दिनांक १८ ऑक्टोबर १९९३ नुसार आणि दि.१/८/२०१९ अनुसार, पात्र (संख्या ..............) असलेल्या सर्व नियमित विद्यार्थ्यांची नावे समाविष्ट आहेत.

२. विद्यार्थ्यांच्या नावांची दुबार नोंद घेण्यात आलेली नाही.

३. उपरोक्त पैकी कोणत्याही विद्यार्थ्याला इतर शासकीय योजनेतून परीक्षा शुल्क माफीचा लाभ देण्यात आलेला नाही.

४. यादीमध्ये नमूद केलेल्या पात्र (संख्या ..........) विद्यार्थ्यांची संपूर्ण परीक्षा शुल्क मंडळामध्ये भरणा केली आहे.

स्थळ : ____________

दिनांक : ____________

स्वाक्षरी व शिक्का

मुख्याध्यापक / प्राचार्य